## राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष
## राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान
## (महाराष्ट्र राज्य)

---

जा.क्र /रा.गां.पं.स.अ./प्रशि./ ७७७/२०१६

दि. ०९ जून, २०१६

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, (सर्व)**

**विषय - 'आमचं गाव आमचा विकास' कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये प्रकरण ६ मुद्दा क्रमांक ६.१.२.६ / ६.१.१.६ / ६.१.२.२ बाबत स्पष्टीकरण.**

**संदर्भ —** १. ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक.जीपीडीपी-२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६, दिनांक ०४/११/२०१५
२. ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र.जीपीडीपी २०१५//प्र.क्र.३८/पं.रा.६, दिनांक ०८ जून, २०१६

'आमचं गाव आमचा विकास' अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना संदर्भ १ अन्वये निर्गमित करणेत आलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनातील प्रकरण ६ मुद्दा क्रमांक ६.१.२.६ / ६.१.१.६ / ६.१.२.२ बाबत शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केलेले आहे.

**मुद्दा क्र. ६.१.२.६ बाबत :**

वार्षिक विकास आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे विभागनिहाय निधीचे नियोजन करणे आवश्यक राहील.

अ) महिला व बालकल्याण :१०%

ब) अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात.

क) आरोग्य, शिक्षण, उपजिवीका (Livelihood) :२५%

ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी विभागनिहाय टक्केवारीची तरतूद फक्त १४ व्या वित्त आयोगाच्या निधीसाठी लागू राहील.

**मुद्दा क्रमांक ६.१.१.६ आणि मुद्दा क्रमांक ६.१.२.२ बाबत :**

ग्रामपंचायत पंचवार्षीक विकास आराखडा तयार करताना एकूण उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दुप्पट व वार्षीक विकास आराखडा तयार करताना दीडपट निधी विचारात घ्यावयाचे नमूद केलेले आहे.

याबाबत ग्राम पंचायतींना उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून प्राप्त होणा-या निधीमध्ये वाढ (दुप्पट वा दीडपट) न करता मुळ तरतूदीनुसार आराखडा तयार करण्यात यावा. फक्त १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दुप्पट निधी पंचवार्षिक आराखड्यासाठी व दिडपट निधी वार्षिक आराखडा तयार करताना विचारात घेण्यात यावा, असे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

---

याबाबत त्वरीत खालीलप्रमाणे आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी.

१) सदरचे स्पष्टीकरण आपले स्तरावरून लेखी स्वरूपात सर्व खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, प्रभारी अधिकारी (विस्तार अधिकारी), जिल्हास्तरीय प्रमुख प्रविण प्रशिक्षक व गणस्तरीय प्रविण प्रशिक्षक यांना कळवून त्यानुसार कार्यवाहीबाबत सूचना द्याव्यात.
२) प्रभारी अधिकारी व प्रविण प्रशिक्षक यांनी यापुढे होणा-या सर्व प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये, वरील स्पष्टीकरणाप्रमाणे त्यांच्या सादरीकरणामध्ये (PPT) बदल करून प्रशिक्षण घ्यावे.
३) गणस्तरीय कार्यशाळांमध्ये तसेच ग्रामपातळीवरील नियोजन प्रक्रियेदरम्यान वरील स्पष्टीकरणाप्रमाणेच कार्यवाही होईल, याची खातरजमा करावी.

सोबत - शासनाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्राची प्रत.

**राज्य प्रकल्प संचालक** ९/६.
राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,
राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :**

१) मा.प्रधान सचिव, (ग्राम विकास व पंचायतराज), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१ यांना माहितीस्तव सादर
२) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
३) उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४) विभागीय प्रकल्प उप संचालक, रा.गां.पं.स.अ.कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी